REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2025

# ऊसतोड मजुरांच्याजीवनावरील साहित्य लेखन: स्वरूप व प्रेरणा

**सौ. राणी संतोष शेंडकर**

**प्रा. डॉ. प्रवीण ताटे देशमुख**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, मु.सा.काकडे महाविद्यालय,**
**सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि.पुणे.**

**सारांश:**




साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजाचे प्रतिबिंब हे साहित्यात उमटलेले दिसते. त्यामुळे मानवाच्या आयुष्यात साहित्याला सर्वाधिक महत्व आहे. जर्मनीत हर्डर या अभ्यासकाने, "साहित्य हे आपल्या काळाचे अपत्य असते"[१] हे दाखवून दिलेले आहे.आदिम काळापासूनच साहित्य आणि मानव यांचा घनिष्ठ संबंध पहायला मिळतो. लिखित साहित्य व मौखिक साहित्य अशी साहित्याची प्रामुख्याने दोन अंगे पहायला मिळतात.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. वाचन, लेखन करणारांचा एक वर्ग तयार झाला. परिणामी मजूर, दलित, मागास लोकांमध्ये आत्मभान तयार झाले. परिणामी त्यातूनच 'स्व'ची जाणीव होऊन ऊसतोड मजूर देखील लेखन करून स्वतःचं जगणं, होरपळणं साहित्याच्या माध्यमातून मांडू लागला. समाजात शेती करणारा शेतकरी अनेक क्षेत्रांशी संबंधित असतो. त्यामुळे हा समाजदेखील साहित्याचा विषय झाला आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीत अनेक बदल झाले. परिणामी शेतीचे उत्पादन वाढले. स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखानदारी उभी राहिली. त्यातूनच ऊसतोड करण्यासाठी कामगार तयार झाला. हा कामगार अल्पभूधारक असतो. स्वतःच्या शेतातील कामे संपल्यानंतर हा मजूर ऊसतोडणीसाठी सहा ते सात महिन्यांकरिता स्थलांतर करतो. याच मजुरांचे जीवन मराठी साहित्यात आपणाला चित्रित झालेले पहायला मिळते. त्यामुळे हा समाज साहित्यातील कथा, कविता, कादंबरी, ललित, आत्मचरित्र या सर्वच साहित्यकृतींचा विषय झाल्याचे पहायला मिळते.

## प्रस्तावना

उत्तम कांबळे, बा. ग. केसकर, रा. रं. बोराडे, विजय जावळे, कैलास दौंड, भास्कर बडे, ज्ञानेश्वर जाधवर, सुरेश पाटील, दीपा क्षीरसागर, कल्पना दुधाळ, योगिराज बागूल, विठ्ठल जाधव इ. लेखकांनी ऊसतोड मजुरांचे हलाखीचे जीवन, व्यथा, वेदना, दारिद्र्य, उपसमार, विद्रोह, नकार, शिक्षण, कुटुंबाची हेळसांड यांचे चित्रण मराठी साहित्यात केलेआहे.

## ऊसतोड मजुरांवरील साहित्याचे स्वरूप

ऊसतोड मजुरांच्याआयुष्यात आनंद कमी आणि दुःख, वेदनाच जास्त आहेत. त्यांचे जगणे सहा महिने गावात आणि सहा महिने कारखान्यांवर असे असते. चार-पाच पिढ्या त्यांच्यामागचे दुष्टचक्र हटलेले नाही. जग बदलत गेले, आधुनिक होत गेले परंतु ऊसतोड

मजुराचे जिणे काही बदलले नाही. स्वातंत्र्यानंतरआजही ते तसेच आहे. मराठी साहित्याने त्यांच्या या जगण्याचा वास्तव वेध घेतलेला दिसून येतो.

'कुणाच्या खांद्यावर' (१९८४, बा. ग. केसकर) या कादंबरीत ऊसतोड मजुरांच्यावास्तव वेदना, दुःख, अत्याचार, लैंगिक छळ, कर्जामुळे आलेली हतबलता, मुकादम-ठेकेदार यांच्याकडून होणारे शोषण याचे वास्तव चित्रण कादंबरीत आलेले पहायला मिळते. अंगावर घेतलेली उचल फेडण्यासाठी सहा-सातमहीने घरापासून लांब राहणं, पैसे कमविण्यासाठी ढोरकष्ट करणं कादंबरीत आलेलं आहे. गोड उसातून तयार होणारी गोड साखर अनेकांच्या जीवनात गोडवा पेरते पण या प्रक्रियेतील महत्वाचा घटक असलेल्या मजुराची कशी ससेहोलपट करते याचे विदारक चित्र कादंबरीत आले आहे. 'कोयत्यावरचं कोक' या कादंबरीतही ऊसतोड मजूर महिलांच्या वाट्याला येणारं जगणं पाहून हृदय पिळवटून जातं. भाकरीसाठी ऊसतोड करायला निघालेल्या हजारो मजूर महिला गर्भाशय काढून टाकतात हे भयाण वास्तव उत्तम कांबळे यांनी या कादंबरीत मांडले आहे. त्याचबरोबर मराठी कादंबरीत सरदार जाधव यांची 'कोयता', दिनकर जायभाये यांची 'हिरवा डोंगर', कैलास दौंड यांची 'पाणधुई', रायभान दवंगे यांची 'प्रहार', भास्कर बडे यांची 'पाणकणसं', परशुराम नगरगोजे यांची 'पाचट' आदी कादंबऱ्याही ऊसतोड मजुरांच्या वास्तव जीवनाचे चित्रण करतात. भास्कर बडे यांच्या 'अंजीमाय' कादंबरीतून ऊसतोड करणाऱ्या विधवा स्त्रियांच्या जगण्याची कारणे, कहाणी अधोरेखित केली आहे.

ज्ञानेश्वर जाधवर लिखित 'यसन' कादंबरीत मजुरांचे कष्ट, त्यांचे हलाखीचे जगणे, कादंबरीचा नायक वामन याच्या जगण्याच्या धडपडीचे, संघर्षाचे वर्णन अतिशय संवेदनशीलपणे व हृदय पिळवटून टाकणारे आहे.

"ज्याच्या हातात यसनीचं दावं त्यानं पोट भरून तुपाशी खावं|
अन ज्याच्या नाकात यसनीचं दाव त्यानं उपाशी रहावं||"[२]

खरं तर जनावरांच्या नाकात यसन असते परंतु आज जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण यामुळे ऊसतोड मजुरांचं जगणं यसनीनं अगदी घट्ट बांधलेलं आहे. हे पुस्तकाच्या आशयावरून जाणवते.कैलास दौंड यांची 'पाणधुई'या कादंबरीच्या प्रस्तावनेत पुढील काळात मजुरांनाआपल्याल मिळत असणाऱ्या रोजगाराला मुकावे लागणार आहे याबबात भास्कर बडे लिहितात, "पारंपरिक ऊसतोडसुद्धा आता बदललीय. हार्वेस्टरसारखा महारक्षस हजोरा ऊसतोड कामगारांच्या चुल्हीत पाणी टाकणार आहे आणि आहेरेंना अधिक श्रीमंत करणार आहे. नव्या संकेतासह, नवे प्रश्न आणि भविष्यात जगण्याचा प्रश्न अधिक गंभीर झाल्याचे सुतोवाच 'पाणधुई' वाचताना आढळते. म्हणून ही कादंबरी महत्वाची वाटते."[3] यांत्रिकीकरण ही एक ऊसतोड कामगारांपुढील मोठी समस्या आहे आणि ही समस्या त्यांचा रोजगार संपवून त्यांना आयुष्यातून उठवू शकते हे नवे संकट या कादंबरीमध्ये समोर आले आहे.

श्रीराम गुंदेकर यांनी 'उचल' या कथासंग्रहातून ऊसतोड मजुरांचे व्यथित जीवन मांडले आहे. भास्कर बडे यांच्या 'चिकाळा', 'पांढर', 'खिलाऱ्या' या कथासंग्रहांतूनहीमजुरांच्या समस्या मांडल्या आहेत. 'पाचरट', 'तोड चिठ्ठी', 'पाचोळा' या विठ्ठल जाधव यांच्या कथाही वैशिष्ट्यपूर्ण व मजुरांच्या जीवनातील वेदनांवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. अशा अनेक कथांमधून ऊसतोड कामगारांचे जीवन चित्रित झाल्याचे पहायला मिळते. सततचा दुष्काळ, पावसाळयात जाणवणारी हिरवळ हळूहळू ओस आणि रखरखीत होत जाते हे बालाघाटच्या डोंगराळ भागातील अनेक गावांचे चित्र आहे. ऊसतोडणीसाठी केलेले स्थलांतर, वयोवृध्द माणसांची होणारी आबाळ, मुलांच्या शिक्षणाची हेळसांड, लेकीबाळींची लग्न, उराशी असणारी स्वप्नं, मुकादमांकडून घेतलेली उचल, गावी जाण्याची ओढ, निवाऱ्याचा अभाव, वीज-पाणी अशा मूलभूत सुविधांचा अभाव असणाऱ्या संघर्षमय जीवनाचे चित्रण या कथांमधून आले आहे. 'झुंज तिची पाचटाशी' या कथासंग्रहात अनेक कथानकांत एक गोष्ट समांतर पहायला मिळते ती म्हणजे, बरेच आईबाप आपल्या मुलीचे लग्न लहान वयातच लावून देतात. त्यांना जबाबदारीतून लवकर मुक्त व्हायचे असते. अनेक मुलींवर बलात्कार होतात, महिलाही पुरूषांच्या वासनेच्या शिकार होतात हे कथांमधून आले आहे. तसेच बलात्कारानंतरचे जगणे मरणप्राय असते अशा भिती पालकांच्या मनात दाटल्याचे भयाण चित्रण आहे. या कथासंग्रहात स्त्रियांचे वेगवेगळया ठिकाणी होणारे शोषण मांडलेले आहे.

या संदर्भात डॉ. विलास खोले म्हणतात, "निरनिराळया पातळयांवर होणारे स्त्रीचे शोषण ही जागतिक पातळीवरची वस्तुस्थिती फिनॉमेनान आहे. तिच्या अनेक परी आहेत दारिद्र्य, बालविवाह, अकाली येणारे बाळंतपण, त्यांची धड सोय नसणे, शाळेत रमण्याच्या वयात शिक्षण सोडावे लागणे, घरकामात किंवा आणि मजुरीत जीवन घालवणे या दुर्दशेची समजूत शहरांतून, सदनिकांतून राहणाऱ्या, लेखन-वाचन, नोकऱ्या, व्यवसायत गुंतलेल्या स्त्री पुरूषांना येणार नाही"[४]

योगीराज बागूल यांनी ‘पाचट’ या आत्मकथनातून ऊसतोडीचे काम करणाऱ्या दलित कुटुंबाचे चित्रण हे वैजापूर परिसरातील बोलीभाषेत केलेले आहे. ऊसतोड मजूर हा असंघटीत कामगार असल्यामुळे ते आत्मचरित्रात लिहितात की, “ऊसतोड कामगार वर्ग हा असंघटीत, उपेक्षित, अशिक्षित, कानून कायद्याची जाण नसलेला आणि अंधश्रध्देवर विश्वास असलेला असतो. या कामगारांना संघटित करणे अवघडच. कारण एखाद्या वर्षी पावसाळा कमी असला, विहीरीला पाहिजे तसं पाणी नसलं, पीकपाणी बरोबर नसलं की जास्त लोकं तोडीला जातात आणि पुढच्या साली भरपूर पाऊस पडला की तोडीवाल्याच्या संख्या अर्ध्याहून कमी होतात. त्यामुळे या कामगारांची संघटना बनवणार कशी?”[५] योगिराज बागूल यांनी असंघटित कामगारांची व्यथा नेमकेपणाने मांडलेली आहे. शिक्षणाधिकारी पोपट काळेऊसतोड मंजुराच्याघरात जन्मलेले असून ‘काजवा’ या आत्मकथनात स्वतःच्या जगण्याची व्यथा मांडतात.

साहित्यक्षेत्रातशेती, शेतकरी, मजूर यांच्यावर मोठ्या प्रमाणात काव्यलेखन झाले आहे. याची सुरवात महात्मा फुले यांच्यापासून झाली. परंतु ऊस किंवा ऊसतोड मजूर यांच्या विषयावर काव्यलेखन १९८० च्या आसपास झालेले पहायला मिळते. ऊसतोड मजुरांवरील कविता या बहुतांशी स्वअनुभवातून कवींनी लिहिलेल्या पहायला मिळतात. भास्कर बडे, रायभान दवंगे, कैलास दौंड, सय्यद अल्लाउद्दीन अशी प्रमुख कवींची नावे पहायला मिळतात. कैलास दौंड ‘उसाच्या कविता’ या काव्यसंग्रहात ऊसतोड मजुरांचेजीवन सखोलपणे मांडतात. मजुरांच्याआर्थिक संघर्ष, राहणीमान, त्यांचे दुःख, संस्कृती, भावनाशीलता अशा अनेक गोष्टींचे चित्रण ते काव्यातून करतात. ‘तोड’मध्ये तर रायभान दवंगे मजुरांचेलाचारीचे जगणे, दुःख-वेदना, अत्याचार सोसणारे मजूर, पोटासाठी संघर्ष करणारे मजूर त्यांच्या कवितेतून मांडतात. आयुष्यात स्वतःचा आनंद, स्वप्न बाजूला ठेवून वारा, पाऊस सहन करताना राबणारा मजूर ‘तांडा’ याकवितासंग्रहातून दिसतो. कारखान्याच्या मक्तेदारीचा फास, पिळवणूक, भांडवलदारीचा परिणाम ऊसतोड मजुरांना सातत्याने करावा लागतो. अशा विविधांगी जीवनाचे चित्रण ‘ऊचल कोयता तोडीला’ या काव्यसंग्रहात सय्यद अल्लाउद्दीन करताना दिसतात. मजुराने मुकादमाकडून घेतलेली उचल कधीच फिटत नाही. उचल फिटल्यास प्राप्त परिस्थितीमुळे परत उचल घेतली जाते. परिणामी मुकादम-ऊसतोड मजूर नातं काही केल्या संपत नाही. जणू काही ऊसतोड मजूर हा ऊस तोडणीसाठीच जन्माला आला आहे ही भावना कवितेतूनजाणवते.

“तोडीवाल्याचा जलम
कोयता गरभारणीच्या हाती
फडात बाळंतीन होती
तोडीवाल्याचा जलम
कोयता पोरापोरीच्या हाती
सपन उद्याचे रेखिती”(उचल कोयता तोडीला, पृष्ठ क्र.४७)

जागतिकीकरणाच्या युगात साखरउद्योगातही खूप मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. ऊसतोड मजुरांचीजागा यंत्र घेऊ लागला आहे. हार्वेस्टर नावाच्या ऊस तोडणाऱ्या यंत्रामुळे मजुरांच्या रोजगारावर संकट येऊ लागले आहे. यामुळे नवीन पिढी या व्यवसायात पडण्याऐवजी शहरांकडे जाऊन मजुरी करू पाहतो आहे. ढोरकष्ट करण्याचे नवी पिढी नाकारू लागली आहे. अशा शक्यताही मराठी साहित्यातून वर्तविल्या जात आहेत.

## ऊसतोड मजुरांवरीलसाहित्याच्या प्रेरणा

ऊसतोड मजुरांच्या जीवनावरील साहित्यातून मंजुरांच्याव्यथा, त्यांचे कष्ट, दुःख,दारिद्र्य त्यांचा नकार, विद्रोह या सर्व गोष्टींचे चित्रण आले आहे. समाजात असणाऱ्या या वंचित, दुर्लक्षित, संघर्षमय जीवन जगणाऱ्या मजुरांच्या जगण्याचे वास्तव चित्रणकरणाऱ्या लेखकांच्या जाणीवा व संवेदना या साहित्यात प्रतिबिंबित होत असतात.या लेखकांच्या लेखन प्रेरणा तपासणे अत्यंत गरजेचे आहे. व्यक्तिगत भावना, सामाजिक बदलाची इच्छा, ऐतिहासिक व भविष्यकालीन दृष्टिकोनातून लेखकांना ऊसतोड मंजुरांवरलेखन करण्याची प्रेरणा मिळत असते. त्या सर्व प्रेरणाचा सविस्तर विचार आपण करू-

### महापुरूषांच्या प्रेरणा -

महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील आदींनी लोकांमध्ये जनजागृती केली. समाजाच्या उध्दारासाठी चळवळी उभारल्या.

बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले. लोकांमध्ये समतेचे बीज रोवले. यातूनच शोषित, पिडित समाजाला जाग आली, आत्मभान आले. महापुरूषांच्या चळवळींमुळेच स्वातंत्र्यानंतरग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण हळूहळू वाढू लागले. पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या दूरदृष्टीने आणि बाबासाहेबांच्या धोरणीपणामुळे संविधानाने शिक्षणाचा अधिकार हा मूलभूतअधिकार केला. त्यामुळे विशेषतः साठीच्या दशकानंतर शिक्षणाला वेग आला, मागास घटकांच्या, दलितांच्या, बहुजनांच्या चळवळी उभ्या राहिल्या. चळवळींची दखल घेत पुढे ऐंशीच्या दशकात मागास समाजही बऱ्यापैकी शिक्षणाच्या प्रवाहात आला. केंद्रसरकारने स्थापन केलेल्या विविध शिक्षण आयोगांनी वंचितांपर्यंत शिक्षण नेण्याच्या मोहिमेस बळ दिले. शिक्षणाच्या या प्रसाराने मागे राहिलेल्या घटकांना, ऊसतोड मजुरांसारख्या शोषितांना, कामगारांना अन्यायाची, शोषणाची जाणीव होऊ लागली. यातून संघर्ष, चळवळी वाढत गेल्या. नव्या पिढ्यांच्या हाती पेन आले. या चळवळींच्या आणि शिक्षणाच्या प्रेरणा घेऊन ग्रामीण भागातील तरूण लेखक लिहू लागले.

महात्मा फुले यांनी सगळ्या अनर्थांचे मूळ अविद्येत आहे हे सांगितले होते. हजारो वर्ष विद्येपासून, ज्ञानापासून बहुजन समाजाला दूर ठेवण्यात आले. त्यामुळे सगळे अनर्थ घडत आहेत हे जाणवल्याने फुले दांपत्याने शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्या कामाचा पसाराही वाढत गेला मात्र खरा प्रसार झाला तो स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने देशभरात शाळा उघडल्या आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले. ज्ञानाची गंगा घराघरात पोहोचली. सर्व स्तरांतील मुले शिक्षणाकडे वळली. स्वातंत्र्यानंतरडॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासह समाजसुधारकांनीही जाणीवपूर्वक शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले. कुणी वसतीगृहात राहून तर कुणी नातेवाईकांकडे राहून मजुरांचीमुले शिकली. बदलाच्या, परिवर्तनाच्या मार्गाने जायची उर्मी त्यांच्यामध्ये होती. अलिकडच्या तीन दशकात शिक्षणाचे महत्त्व आणखी अधोरेखित झाले. या शिक्षणप्रसारामुळे नोकऱ्या मिळतात, कष्टात्मक जगण्यातून सोडवणूक करून घेता येऊ शकते याची जाणीव होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ राष्ट्रीय नव्हे तर जागतिक पातळीवरील एक महान व्यक्तिमत्व होते. चळवळींचे प्रेरणास्थान होते. त्यांनी केवळ दलित समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम केले नाही तर समस्त पिडीत, शोषित, कष्टकरी कामगारांच्या कल्याणासाठीही ते प्रयत्नशील होते. "शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा!" हा त्यांनी दिलेला संदेश या समकालिन साहित्यिकांना नेहमीच प्रेरणादायी ठरला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी तत्वज्ञानातून भारतीय समाजव्यवस्थेतील शोषित, उपेक्षित, मजूर, पिडीत, नाकारलेला माणूस संघर्षासाठी प्रवृत्त झाला. तो विचार करू लागला. तो शिकू लागला. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची मग त्याला जाणीव होऊ लागली. याच वेदना हा समाज साहित्याच्या जाणिवेतून मांडू लागला.

या शिक्षणप्रसाराचा साहित्यनिर्मितीवर परिणाम झाला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पोपट काळे! खरे तर हा एका सर्वसामान्य ऊसतोड मजुराचा मुलगा. शिक्षणाच्या बळावर त्यांनी स्वतःची या दलदलीतून सुटका करून घेतली आणि एक उत्कृष्ट शिक्षणाधिकारी म्हणून त्यांनी प्रवास केला.त्यांनी 'काजवा' नावाचे आत्मचरित्र लिहिले. ज्ञानेश्वर जाधवर हादेखील ऊसतोड मजुराचाच मुलगा. शिक्षणाने त्याने परिस्थिती बदलली. 'यसन' कादंबरीतूनत्याने आपल्या व्यथा, वेदनांना वाट करून दिली. त्यामुळे ऊसतोड मजुरांच्या लेखनामागच्या प्रेरणा शोधताना शिक्षणप्रसार आणि चळवळी या महत्वाची प्रेरणा ठरतात.

### विविध व्यक्ती व संघटनांचे कार्य-

ऊसतोड मजूरांच्यासमूहांचे नेतृत्व करणाऱ्या काही व्यक्ती पुढे आल्या. पिढ्यानपिढ्या ऊसतोड करणाऱ्या मजुरांचाआवाज त्या व्यक्ती बनल्या. या व्यक्तींच्या कार्यातून मराठी साहित्यातील लेखकांना प्रेरणा मिळाल्याचे दिसते.

१९६५ साली बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथे हरिभाऊ ढाकणे यांनी ऊसतोड मजुरांचासंप घडवून आणला. पुढे ऊसतोड मजुरांच्या आंदोलनाचे नेतृत्व हरिभाऊ ढाकणे यांचे सहकारी व माजी केंद्रीय मंत्री बबनराव ढाकणे यांच्याकडे आले. ढाकणे यांनी १९७० साली राज्यातील ऊसतोड मजुरांचाव मुकादमांचा सर्वप्रथम पहिला मोर्चा काढला आणि तो यशस्वी करून दाखविला.

पुढे १९८६-८७ नंतर ढाकणेंच्या एकमुखी नेतृत्वात संघटना स्थापन करण्यातआली. त्या वर्षी ६५ टक्के इतकी ऐतिहासिक वाढ मजुरांना मिळाली होती. ही परंपरा पुढे चालू राहिली.

गोपीनाथ मुंडे हे बीड जिल्ह्यातील अत्यंत प्रभावशाली नेतृत्व होते. पुढे ते भाजप या पक्षाच्या माध्यमातून राज्याचे नेते बनले. ऊसतोड मजुरांच्या संघटनांची त्यांनी बांधणी केली. संघटनेतील काही नेत्यांना त्यांनी राजकारणात संधी दिली. आपल्यातील एक मनुष्य राज्याचा नेता होतो हे पाहून मजुरांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. मजुरांना आत्मभान आले. मुंडे आणि ढाकणे यांना डोळ्यापुढे ठेवून

चळवळींची मांडणी मराठी साहित्याने केल्याचे साहित्यात दिसून येते. साखर कारखानदारीचे मोठे नेते शरद पवार यांनीही ऊसतोड मजुरांच्या प्रश्नांना सरकार, साखर कारखानदार आणि मजुरांचे प्रतिनिधी यांच्या एकत्रित बैठका घेऊन सोडविण्याचे महत्वपूर्ण काम केले. पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, श्रीमंत जायभाय, बाबासाहेब बांगर, सुखदेव सानप, सुरेश धस असे नेते निर्माण झाले. याच्यातूनच राज्यसरकारने 'गोपीनाथ मुंडे ऊसतोड मजूर कल्याणकारी महामंडळ' स्थापन झाले.

मधुकर कात्रे यांनीही गाडीवान कामगार युनियन, साखर कामगार संघटना, अंगणवाडी कर्मचारी संघटना अशा विविध संघटनांचे नेतृत्व केले. ऊसतोड मजुरांच्या मुलांचे शिक्षण, हजेरीपत्रक, पगारपत्रक याबाबतचे करार कारखान्यांशी व्हावेत यासाठी त्यांनी लढा दिला. औद्योगिक न्यायालयामार्फतही कात्रे यांनी प्रयत्न केले.

गहिनीनाथ थोरे पाटील व बाबासाहेब बांगर हे वेगवेगळ्या दोन ऊसतोड मजूर व मुकादमांच्या संघटनेचे अध्यक्ष आहेत. दोघेही प्रभावशाली नेते असून ऊसतोड मजूर व सरकार यांच्यात वेतनाबाबत व अन्य प्रश्नांबाबत जे सामंजस्य करार होतात यात यांच्या संघटनांची भूमिका महत्वाची असते. अशा विविध व्यक्ती व संघटनांनी मंजुरांसाठी उभ्या केलेल्या अनेक चळवळींमुळे मंजुरांमध्ये एकप्रकारचे आत्मभान निर्माण झाले, आपणही लढू शकतो, संघर्ष करू शकतो हे मजुरांना जाणवले तर आपणच आपला संघर्ष मांडला पाहिजे या प्रेरणेतून ऊसतोड मजुरांच्या पुढच्या शिकलेल्या पिढ्या लिहू लागल्या.

वर्षा देशपांडे या महिलांसाठी सामाजिक चळवळ राबविणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्या आहेत. त्यांनी बीड जिल्ह्यातही प्रत्यक्ष जमीनस्तरावर जाऊन कार्यकर्ती म्हणून काम केलेले आहे.

हे काम करताना त्यांच्यापुढे महिलांच्या, मुलींच्या अनेक समस्या उभ्या राहिल्या. कुपोषण, निकृष्ट आहार, बालविवाह, गर्भाशय पिशवी काढणे, गर्भलिंगनिदान, गर्भहत्या अशा अनेक समस्यांच्या मुळाशी त्या गेल्या. प्रत्येक समस्येच्या वेळी नवा प्रश्न उभा राहिला. त्याचीच प्रेरणा घेऊन त्यांनी 'कोयत्याच्या मुठीत' हे पुस्तक लिहीले.

### विविध सामाजिक संस्थांचे कार्य –

'मकाम' म्हणजे महिला किसान अधिकार मंच होय. यांनी ऊसतोड मजूर महिलांच्या हक्कासाठी काम करत शासनास दखल घ्यायला लावली. जनार्थ, ज्ञानप्रबोधिनी, जनसेवा अशा संस्थांनी ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न अग्रभागी आणणले. शांतीवनसारख्या संस्थेनेही ऊसतोड मजुरांचे प्रश्न सामाजिक पटलावर मांडले.

मराठी साहित्यातून आलेले ऊसतोड मंजुरांचे चित्रण मंजुरांच्या वर्तमानकालीन जीवनाचे दर्शन घडवते. मंजुरांच्या जीवनाच्या अंतरंगाचा परामर्श घेताना साहित्य दिसते. हे लेखन केवळ लेखकाची अभिव्यक्ति मांडणारे लेखन नसून त्यांच्या जगण्याचे वास्तव मराठी साहित्य मांडताना दिसते. समाजाला जागे करण्याचे काम साहित्याने केले. अनेक सामाजिक संस्था, व्यक्ती, महापुरुष अशा अनेकांच्या प्रेरणेतून गोष्टीतून हा समाज शिकू लागला आहे, वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून लेखन करताना, स्वतःचे प्रश्न मांडताना मजूर दिसत आहे ही सकारात्मक बाब आहे. आणि या साहित्याची दखल मुख्य प्रवाह घेऊ लागला आहे. शासनालाही दखल घ्यावी लागत आहे. त्यामुळेच ऊसतोड मंजुरांवरीलकेले गेलेले लेखन हे मराठी साहित्यात उपेक्षित व वंचितांचेसाहित्य समृद्ध करणारे आहे.

### सदर्भग्रंथ सूची:

1. डॉ. रवींद्र ठाकूर, 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती १५ मे २००७ पृष्ठ क्र. ७
2. ज्ञानेश्वर जाधवर, 'यसन', स्वयंदीप प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २० मे २०१९, मलपृष्ट
3. कैलास दौंड, 'पाणधुई' शांती पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००४
4. दीपा क्षीरसागर, 'झुंज तिची पाचटाशी', मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती नोव्हेंबर
5. योगराज बागूल, 'पाचट', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९९९, पृ.क्र.१२६